# जाहिर निवेदन

## विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

**विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे या कार्यालयातील सन 2026-27 या आर्थिक वर्षाकरिता (01.04.2026 ते 31.03.2027 या कालावधीसाठी) पेस्ट कंट्रोल (General Pest Control व Rodent Control Treatment) सेवा पुरवण्यासाठी अनुभवी पुरवठादारांकडून सीलबंद दरपत्रके मागविणेबाबत.**

---

इच्छुक पुरवठादारांनी खालील सविस्तर अटी व शर्तींच्या अधीन राहून आपली दरपत्रके सादर करावीत.

1. **कामाची व्याप्ती (Scope of Work):**
   - **General Pest Control:** कार्यालयातील सर्व दालने, शाखा, रेकॉर्ड रूम आणि प्रसाधनगृहे यामध्ये झुरळे, मुंग्या, कोळी व इतर कीटकांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी औषध फवारणी करणे.
   - **Rodent Control Treatment:** कार्यालयीन कागदपत्रे, फर्निचर आणि संगणकीय यंत्रणेचे उंदरांपासून संरक्षण करण्यासाठी 'रॉडंट कंट्रोल' (उंदीर नियंत्रण) प्रक्रिया राबवणे.
   - **नियमितता:** ही सेवा करार कालावधीत दरमहा (Monthly) किंवा कार्यालयाने दिलेल्या सूचनेनुसार तातडीने पार पाडावी लागेल.
2. **अटी व शर्ती:**
   - **दरपत्रक सादरीकरण:** दरपत्रक **सह आयुक्त (सामान्य) पुणे विभाग, पुणे** यांच्या नावे सीलबंद लिफाफ्यात सादर करावे. लिफाफ्यावर "पेस्ट कंट्रोल सेवा 2026-27 साठी दरपत्रक" असा स्पष्ट उल्लेख असावा.
   - **मुदत:** दरपत्रक सादर करण्याची अंतिम मुदत **दिनांक 23.07.2026 रोजी सायंकाळी** 17.45 वाजेपर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त झालेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.
   - **पात्रता व कागदपत्रे:** पुरवठादाराकडे पेस्ट कंट्रोल करण्याचा **वैध परवाना (Pest Control License)** असणे अनिवार्य आहे. **GSTN** नोंदणी आणि **PAN** कार्डची प्रत जोडणे आवश्यक आहे.
   - देयके थेट खात्यात जमा करण्यासाठी बँक खाते क्रमांक, IFSC कोड आणि **रद्द केलेला चेक (Cancelled Cheque)** जोडणे आवश्यक आहे.
   - **निवड प्रक्रिया व दर (विशेष अट): ज्या पुरवठादाराचे एकूण साहित्यापैकी जास्तीत जास्त साहित्याचे/सेवेचे दर सर्वात कमी (L१) असतील, अशा पुरवठादाराला निवडीसाठी प्राधान्य देऊन कार्यादेश पारित केला जाईल. तथापि, ज्या साहित्याचे दर सदर पुरवठादाराने जास्त नमूद केले असतील, त्या उर्वरित साहित्याचा पुरवठा किंवा सेवा देखील संबंधित पुरवठादाराला इतर निविदांमधील प्राप्त झालेल्या किमान दराने (L१ Rate) करणे बंधनकारक राहील. निवड झालेल्या पुरवठादाराला (L१ Vendor) उर्वरित साहित्याचा पुरवठा देखील इतर निविदांमधील प्राप्त किमान दराने (L१ Rate) करणे बंधनकारक राहील. जर संबंधित पुरवठादाराने त्या दराने पुरवठा करण्यास असमर्थता दर्शवली किंवा टाळाटाळ केली, तर कार्यालयाला तो विशिष्ट माल/साहित्य बाजारभावाने किंवा मूळ L१ असणा-या दुस-या पुरवठादाराकाडून घेण्याचा सर्वाधिकार राहील आणि होणा-या जादा खर्चाची वसुली संबंधित पुरवठादाराच्या देयकातून केली जाईल, याची गंभीरपणे नोंद घ्यावी.**
   - **औषधांचा दर्जा:** वापरण्यात येणारी कीटकनाशके ही मानवी आरोग्यास अपायकारक नसावीत आणि ती शासनमान्य (CIB प्रमाणित) असावीत.
   - **दराची स्थिरता:** नमूद केलेले दर सर्व करांसहित (Including GST) असावेत आणि ते पूर्ण चालू आर्थिक वर्षासाठी तसेच पुढील आर्थिक वर्षासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्थिर राहतील. एकदा दर निश्चित झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत दरवाढ मान्य केली जाणार नाही.

### 3. दंडात्मक तरतुदी (Penalty Clauses):

- **विलंब दंड:** कार्यालयाने तक्रार किंवा सूचना दिल्यानंतर 24 तासांच्या आत सेवा न दिल्यास, नियमानुसार कारवाई केली जाईल.
- **काम अर्धवट सोडणे:** जर पुरवठादाराने कराराच्या मध्यातच सेवा बंद केली किंवा निकृष्ट सेवा दिली, तर त्यांना 'काळ्या यादीत' (Blacklist) टाकण्याची कार्यवाही केली जाईल.

### 4. देयके आणि प्रदान (Payment Terms):

- **काम पूर्ण झाल्यावर देयके:** विषयांकित कामाची देयके ही प्रत्येक महिन्याचे काम समाधानकारकपणे पूर्ण झाल्यावर व संबंधित शाखाधिकाऱ्याचा अहवाल प्राप्त झाल्यावरच अदा केली जातील.
- **अग्रिम रक्कम:** कोणत्याही परिस्थितीत कामासाठी **अग्रिम (Advance) रक्कम दिली जाणार नाही.**
- **करांची कपात :** देयके अदा करताना नियमानुसार सर्व कर व दंडाची रक्कम (असल्यास) वजा केली जाईल.

### 5. दरपत्रक नमुना (Financial Bid):

| **अ.क्र.** | **कामाचा तपशील** | **परिमाण (Unit)** | **१ ते ४ बाबत दरमहा एकत्रित दर (GST सह) Including All services Amount Monthly** |
|---|---|---|---|
| 1 | **General Pest Control** (संपूर्ण कार्यालय परिसर) | 2 Time in a Month | |
| 2 | **Rodent Control Treatment** | 2 Time in a Month | |
| 3 | **Mosquitoes Control Treatment** | 2 Time in a Month | |
| 4 | विशेष फवारणी (तातडीची गरज भासल्यास) | | |

### 6. निविदा प्रक्रिया:

- प्राप्त दरपत्रके **दिनांक 24.07.2026 रोजी सकाळी 11.00 वाजता** समितीसमोर उघडण्यात येतील.
- सर्वात कमी दर (L1) असणाऱ्या आणि सर्व अटी पूर्ण करणाऱ्या पुरवठादाराची निवड केली जाईल.
- **दरपत्रके मंजूर करण्याचा अंतिम अधिकार दरपत्रक समितीचा राहील. या निर्णयाबाबत कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.**
- निवड झालेल्या पुरवठादारास 8 दिवसांच्या आत **रु. 500/- च्या स्टॅम्प पेपरवर** संमतीपत्र/हमीपत्र लिहून देणे बंधनकारक असेल.

**(तुषार ठोंबरे)**
**सह आयुक्त (सामान्य)**
**पुणे विभाग, पुणे**

**प्रत** :- 1. कार्यालयीन नोटीस बोर्ड,
2. अधिकृत संकेतस्थळ प्रसिद्धीसाठी.